# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदीरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

जा.क्र. मनपा/पापु व मलनि:/९८८८/2023-24 दि. ०९/११/२०२३

प्रती,

सिस्टिम मॅनेजर,

संगणक विभाग,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नेमण्यात आलेल्या ठेक्याची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** :- उप-आयुक्त (मुख्यालय) यांचेकडील जा.क्र.मनपा/आस्था/1802/2023-24 दि.30/10/2023 रोजीचे पत्र.

महोद्य,

उपरोक्त विषयांन्वये मा. उप-आयुक्त (मुख्यालय) यांनी कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता आणण्याचे दृटीने महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत देण्यात आलेल्या ठेक्याच्या संदर्भात सर्व कागदपत्रे मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

त्यानुसार पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागामार्फत ठेका पध्दतीने पुरवठा करण्यात येणाऱ्या मजुर कर्मचाऱ्यांच्या कामासंबंधित ठेकेदारास देण्यात आलेला कार्यादेश व ठेकेदारासोबत करण्यात आलेल्या करारनाम्याची माहिती सोबत जोडून देण्यात येत आहे. सदरची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-40110

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //


दि. 31 /03 /2023

जा.क्र./मनपा/पा.पु./कार्या/ ७ ९ /2022-23

## // कार्यादेश //

प्रति,
मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.
33, सुरज प्लाझा,
चंदुलालवाडी, देना बँक समोर,
भाईंदर (प.)

विषय :- पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजूर कर्मचारी पुरवठा करणे. (बी-2 फॉर्म)

संदर्भ :- 1) मा. आयुक्त सो. यांची दि.29/12/2020 रोजीची आर्थिक व प्रशासकिय मान्यता
2) फेर-निविदा सुचना क्र.32 (2022-23) दि.21/11/2022
3) मा. आयुक्त यांची दि.06/02/2023 रोजीची निविदा मंजूरी
4) प्रशासकिय ठराव क्र.240 दि.08/02/2023 अन्वये निविदा मंजूरी
5) जा.क्र.मनपा/पा.पु./1822/2022-23 दि.10/02/2023 अन्वये स्वीकृतीपत्र
6) सुरक्षा अनामत रक्कम रु.13,00,000/- बँक गॅरटी नं.240GT02230610001दि.02/03/2023
7) दि:2९03 /2023 रोजीचा करारनामा

वरील संदर्भिय विषयानुसार कळविण्यात येते की, **पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजूर कर्मचारी पुरवठा करणे. (बी-2 फॉर्म) (अंदाजित रक्कम रु.2,60,00,000/-) (Tender Id:-853781_1)** हे काम **किमान वेतनावर रु. 1/- सर्विस चार्जेस/ प्रशासकिय चार्जेस** या दराने मंजूर करण्यात येते आहे. सबब उपरोक्त काम सुरु करणेस या पत्राव्दारे कार्यादेश देण्यात येत आहे. या कामाची मुदत कार्यादेशाच्या दिनांकापासून 12 महिन्यांची राहील.

**अटीशर्थी :-**

1. सदरचे काम आदेश प्राप्त झाल्यापासून 3 दिवसाच्या आत संबंधित कनिष्ठ अभियंता/उप अभियंता यांच्या नियंत्रण व देखरेखेखाली सदर काम सुरु करण्यात यावे. तथा कामाचा फलक लावण्यात यावा.
2. सदरचे काम त्रयस्थ लेखापरिक्षण कक्षेत असल्यास त्रयस्थ लेखापरिक्षणाचे अहवाल अद्यावत ठेवण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु. व मलनि:)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**<u>प्रत : कार्यवाहीसाठी</u>**
**<u>श्री. प्रफुल्ल वानखेडे - कनिष्ठ अभियंता</u>**

1. सदर काम हे निविदा मधील अटीशर्ती, स्पेसिफिकेशन, मापदंडानुसार, शासन, महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी देण्यात आलेले आदेश व आवश्यक परवानग्या घेऊन विहीत कार्यपध्दत अवलंबुन व अभिलेखाचे जतन करुन कंत्राटदाराकडून मुदतीत काम करुन घेण्याची जबाबदारी व्यक्तीश: आपली राहील.
2. सदर आदेशानुसार कामाबाबतची माहिती विहीत नमुन्यात भरुन वेळोवेळी अद्यावत ठेवण्यात यावी. तसेच कामाची दैनंदिन माहिती व प्रगती केल्यावर तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी.
3. सदर कार्यादेशाची माहिती वॉर्ड मधील संबंधित नगरसेवकांना तात्काळ कळविण्याची दक्षता घेण्यात यावी.
4. सदर काम त्रयस्थ लेखापरिक्षणाच्या कक्षेत असल्यास त्रयस्थ लेखापरिक्षण करुन घेण्यात यावे. कामात वापरण्यात आलेल्या साहित्याची वेळोवेळी सक्षम यंत्रणेकडून समक्ष तपासणी करुन अहवाल संचिकेत अद्यावत ठेवण्यात यावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु. व मलनि:)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

| | | |
|---|---|---|
| ठेकेदाराचे नाव | :- | मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>33, सुरज प्लाझा,<br>चंदुलालवाडी, देना बँक समोर,<br>भाईंदर (प.) |
| कामाचे नाव | :- | पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजूर कर्मचारी पुरवठा करणे. (बी-2 फॉर्म)<br>(अंदाजित रक्कम रु.2,60,00,000/-)<br>(Tender Id:- 853781_1) |
| कामाचा दर | :- | किमान वेतनावर रु. 1/- सर्विस चार्जेस/ प्रशासकिय चार्जेस |
| कामाची मुदत | :- | 12 महिने |

# करारनामा

करारनामा लिहून देणार :- मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.
33, सुरज प्लाझा,
चंदुलालवाडी, देना बँक समोर,
भाईंदर (प.)

करारनामा लिहून घेणार :- कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

कारणे करारनामा लिहून देण्यात येतो की, **पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजूर कर्मचारी पुरवठा करणे. (बी-2 फॉर्म) (अंदाजित रक्कम रु.2,60,00,000/-) (Tender Id:- 853781_1)** या कामास मा. आयुक्त सो. यांनी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. सदर काम **किमान वेतनावर रु. 1/- सर्विस चार्जेस/ प्रशासकिय चार्जेस** या दराने मंजूर झालेले आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासकिय ठराव क्र.240 दि.08/02/2023 अन्वये सदर कामाच्या निविदेला मंजूरी दिलेली आहे. **मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांचा "ठेकेदार" असा उल्लेख करण्यात येईल. तसेच करारनामा लिहून घेणारा यांचा उल्लेख "कार्यकारी अभियंता" असा करण्यात येईल व हे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने कार्यरत असतील. सदर काम खालील अटीशर्तीवर पुर्ण करुन देण्याची जबाबदारी यापुढे ठेकेदाराची राहील.

1) निविदेतील व सदर कामाच्या अंदाजपत्रकातील सर्व अटीशर्ती बंधनकारक असतील.
2) कंत्राटाचा कालावधी कार्यादेश दिनांकापासून 12 महिने राहील. तसेच कामास विलंब झाल्यास बिलंबाचा दर दिवसाला किमान रु.500/- (अक्षरी रु. पाचशे मात्र) असा दंड आकारला जाईल. त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.
3) महानगरपालिकेस आवश्यकता वाटल्यास सदर कामाची मुदत संपल्यानंतर नविन निविदा मंजूर होऊन कार्यादेश निर्गमीत होईपर्यंत पुर्वीच्याच मंजूर दराने ठेकेदारास काम करावे लागेल.
4) अंदाजपत्रकातील परिमाणे अंदाजे आहेत. सबब त्यात वाढ किंवा घट झाल्यास त्यानुसार ठेकेदारास काम करावे लागेल.
5) दिलेल्या कामापैकी कोणत्याही बाबीची परिमाणे आवश्यकतेनुसार व गरजेनुसार कमी अधिक करण्याचा हक्क महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. सदर कामास आवश्यक असल्यास मा.कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व मलनिसारण) यांच्या मंजूरीने मुदतवाढ देण्यात येईल.
6) अंदाजपत्रकामील बाबींच्या स्पेसिफिकेशन नुसार ठेकेदारास काम करावे लागेल.
7) एकूण कामाच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून कामापोटी कपात केली जाईल. सदर रक्कमेत इसारा रक्कमेचा अंतर्भाव केला आहे.
8) सदर सुरक्षा अनामत रक्कम काम पूर्ण झाल्यापासून सहा महिन्यांचा सुरक्षा कालावधी पूर्ण झाल्यानंतर अदा केली जाईल.
9) कामापोटी अथवा साहित्यावर कोणत्याही प्रकारची आगाउ रक्कम दिली जाणार नाही.
10) केलेल्या कामापोटी मा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व मलनिसारण यांनी तयार केलेल्या चालू देयकातून रक्कम अदा केली जाईल.
11) ठेकेदाराने दररोज केलेल्या कामाबाबत संबंधीत विभागातील अधिकाऱ्यांची चलनावर स्वाक्षरी घेणे बंधनकारक आहे. याकामी आवश्यक लागणारी चलन बुक, अहवाल बुक इ. स्टेशनरी स्व:खर्चाने छपाई करावी.
12) सदर कामाअंतर्गत जादा मंजूरांची आवश्यकता लागल्यास मंजूर दरात पुरवठा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.
13) ठेकेदाराने निविदेसोबत जोडलेली कागदपत्रे, निविदा व इतर कागदपत्रे सदर कररनाम्याचे भाग समजण्यात यावे. व सदर कागदपत्रातील अटीशर्थी दोन्ही पक्षकारास बंधनकारक राहील.
14) प्रत्येक देयकातून शासकिय दरानुसार आयकर व इतर लागू होणारी कर कपात केली जाईल.

15) निविदेबाबत तसेच कंत्राट कालावधीतील कामाबाबत व ठेकेदाराला दिलेल्या पेमेंटबाबत भविष्यात लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतल्यास चुकीने जादा दिलेली रक्कम वसूल करण्याचा अधिकार महानगरपालिकेचा राहील व सदर जादा दिलेली रक्कम ठेकेदार यांना महानगरपालिकेस तात्काळ परत करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

16) सदर करारनामा करून दिल्यापासून अथवा कामाचे कार्यादेश दिल्यापासून 15 दिवसांच्या आत काम सुरु न झाल्यास अथवा समाधानकारक प्रगती न झाल्यास व त्याबाबतचा समधानकारक खुलासा न केल्यास सदर कंत्राट रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिका राखून ठेवीत आहे व अशा प्रकारे कंत्राट रद्द झाल्यास सदर कामापोटी ठेकेदाराने भरणा केलेली इसारा व सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.

17) पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग अत्यावश्यक सेवेअंतर्गत असल्याने कोणत्याही परिस्थितीत काम बंद राहणार नाही याची खबरदारी ठेकेदाराने घ्यावयाची आहे. तसे झाल्यास तातडीने पर्यायी व्यवस्था करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

18) पुरवठादाराने नमुद केलेल्या सर्विस चार्जेस / प्रशासकिय चार्जेस दरा व्यातिरिक्त वाढीव दर, कर व इतर भत्ते महानगरपालिका देय असणार नाही.

19) काम करताना जे.सी.बी. मशिनव्दारे किंवा इतर उपकरणाव्दारे अपघात झाल्यास किंवा जिवित वा वित्तहानी झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी पुरवठादारावर राहील.

20) सर्व शासकिय कपात शासनाच्या वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार देयकातून कपात करण्यात येईल व बंधनकार राहील.

21) सदर कामाच्या ठिकाणी कोणताही अपघात घडणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी तसेच कामाच्या ठिकाणी अपघात घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील.

22) पुरवठादाराने मजूर पुरवठा करणेचे काम समाधानकारक न केल्यास किंवा काम मध्येचे सोडल्यास दंड करण्याचा किंवा ठेका रद्द करण्यात आल्यास अथवा नव्याने कंत्राट दिल्यास येणाऱ्या संपुर्ण खर्चाची रक्कम दंडासह वसुल करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील. तसेच सुरक्षा अनामत रक्कम व इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

23) निविदेसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास महानगरपालिका आयुक्त हे लवाद म्हणुन राहतील व त्यांचा निर्णय बंधनकारक राहील. कोणत्याही कारणास्तव प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास दोन्ही बाजुचा खर्च निविदाकारास करावा लागेल दिवाणी व जिल्हा न्यासालयासाठी ठाणे जिल्हा व उच्च न्यायालयासाठी मुंबई उच्च न्यायालय हे क्षेत्र राहील. न्यायालयाचा निर्णय दोन्ही पक्षकारास बंधनकारक राहील.

24) ठेकेदाराने मंजूरांचे नाव हजेरी पत्रकावर नोंदवून स्वत:कडे मस्टर अद्यावत ठेवणे बंधनकार आहे.

25) कंत्राटी मजूरांचे वेतन अदा केल्यास प्रमाणपत्र ठेकेदाराने महानगरपालिकेस सादर करणे बंधनकारक राहील.

26) ठेकेदाराने ठेक्याच्या कालावधीत मंजूरांचे संबंधित सर्व विमा काढणे (Risk Insurance Policy) बंधनकारक राहील.

27) बाल मजूर कायद्याचे पालन करणे ठेकेदारास बंधनकारक राहील याबाबत महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

28) ठेकेदाराने प्रचलित शासकिय नियम पाळणे व बाल कायदा अंतर्गत शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

29) विशेष प्रसंगी जरूर त्या कारणासाठी काम तात्पुरते थांबविण्याचा मा. कार्यकारी अभियंता, (पाणी पुरवठा) यांनी आदेश दिल्यास त्यावर कोणत्याही सबबीवर ठेकेदार यांस नुकसान भरपाई मागता येणार नाही.

30) ठेकेदार/पुरवठादार यांनी केलेल्या कामांची देयके तयार करण्यापूर्वी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार संबंधितांकडून [illegible] चाचणी अहवाल, कामांची

छायाचित्रे, प्रमाणपत्रे, भविष्य निधि (PF) व कर्मचारी विमा (ESIC) व इतर शासकिय देणी अदा केलेल्या चलनांच्या पावत्या इ. देणे बंधनकारक राहील.

31) निविदेत नमुद केलेल्या मजूर पुरवठा संख्येत आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. जादा मजुर पुरवठा करावा लागल्यास त्याच मंजूर दरात मजुर पुरवठा करावयाचा आहे.

32) कामगार कल्याण नियामाप्रमाणे अटीशर्थी अंमजबजावणी करणे बंधनकारक राहील.

33) भविष्य निधि (PF) व कर्मचारी विमा (ESIC) व इतर शासकिय देणी व विविध कर मुदतीत भरणा करणे ठेकेदारास बंधनकारक आहे.

34) सदर कामाकरीता मंजूरांना देय असलेले किमान वेतन दर, भत्ते व इतर सुविधा शासनाच्या नियमानूसार अदा करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

**सदरचा करारनामा आज दि.२८/०३/2023 रोजी चांगल्या मन:स्थितीत लिहून दिला आहे.**

**करारनामा लिहून देणार**

For GURUJI INFRASTRUCTURE PVT. LTD

Authorised Signatory

**(विष्णू जी. शेळके)**
**मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.**
**33, सुरज प्लाझा,**
**चंदुलालवाडी, देना बँक समोर,**
**भाईदर (प.)**

**करारनामा लिहून घेणार**

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

सन २०२३-२४ / करारनामा रजिस्टर
अनु. क्र. ९५३ दि.२८/४/२३अन्वये
नोंद करणेत आली.

महापालिका सचिव
मिरा-भाईंदर महानगरपालिका

उपायुक्त (मुख्यालय)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/ | ४०२/2023-24** **दि.** ३०/१०/२०२३

## <u>परिपत्रक</u>

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नेमण्यात आलेल्या ठेक्याची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत ठेकेदाराची नेमणूक करून ठेका पध्दतीने कामकाज करण्यात येते. सदर ठेक्याची माहिती मिळणेकरीता नागरिक/लोकप्रतिनिधी यांचेकडून माहिती अधिकार/अर्ज सादर करण्यात येतात.

सदर परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता आणण्याचे दृष्टीने महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत देण्यात आलेल्या ठेक्याच्या अनुषंगाने ठेकेदारांसोबत केलेल्या ठेक्याचे अटीशर्ती, करारनामा, कार्यादेश, नियमावली व इतर सर्व कागदपत्रे मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख
मिरा भाईंदर महानगरपालिका

\\deepal\D\आस्थापना विभाग\परिपत्रक\मनपा मार्फत नेमलेल्या खाजगी ठेकेदारांसोबत.doc